# ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिति
# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना
## मान्यता प्राप्त यूनीयन

**दिनांक 12.03.2018**

## "रक्तदान शिबिर - एक सामाजीक बांधीलकी"

बांधवांनो आणि भगिनिंनो

ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिति व कर्मचारी संघटना गेली 33 वर्षे कोणताही खंड पडू न देता अविरतपणे मुंबईतील ओएनजीसीच्या विविध कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करीत आहे. मुंबईमध्ये सर्व वैद्यकीय सोयीनी सुसज्ज असलेली अनेक हॉस्पीटल असल्यामुळे मुंबईतील, संपूर्ण महाराष्ट्रातील तसेच संपूर्ण भारतातील ओएनजीसीचे कर्मचारी, अधिकारी व त्यांचे कुटूंबिय हे मुंबईत वैद्यकीय उपचारासाठी येत असतात. या उपचारा दरम्यान शस्त्रक्रिया झाल्यास तातडीने रक्ताची आवश्यकता भासते. अशा गंभीर प्रसंगात रक्त उपलब्ध करण्यासाठी ओएनजीसीतील रुग्णांच्या नातेवाईकांना त्वरीत रक्त उपलब्ध व्हावे हया एकमेव उद्देशाने 33 वर्षापासुन हि रक्तदान शिबीरे सातत्याने आयोजित केली जात आहेत.

33 वर्षापासुन आयोजित्त करण्यात येत असलेल्या रक्तदान शिबीरात दरवर्षी सुमारे 1500 ते 2000 बाटल्यांचे संकलन होते व हि सर्व शिबीरे ओएनजीसीच्या पॅनेलवर असणा-या लीलावती, हिन्दुजा, रहेजा, जसलोक, कोकीलाबेन, महात्मा गांधी, नानावटी, टाटा कॅन्सर या हॉस्पीटलच्या सहाय्याने घेतली जातात. त्याप्रमाणे स्व. मिनाताई ठाकरे, सायन, नायर, शताब्दी, केईम या महापालीकेच्या हॉस्पीटलना सुध्दा रक्त संकलन करुन दिले जाते. हि शिबीरे ओएनजीसीच्या ग्रीन हाईट्स, 11 हाई, हेलीबेस, मेकर टॉवर्स, पुनम नगर कॉलनी या ऑफीससह उरण प्लांट, पनवेल, न्हावा सप्लाय बेस या ओएनजीसीच्या बाहेरील प्रकल्पामध्ये सुध्दा दरवर्षी घेतली जातात. गेली काही वर्षे वर्सोवा कोळीवाडा, खारदांडा कोळीवाडा, मनोरी कोळीवाडा, मढ कोळीवाडा, वरळी कोळीवाडा येथे सुध्दा रक्तदान शिबीरे घेण्यात सुरवात केली आहे व या कोळीवाडयातून महीलांसह उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असतो. या सर्व रक्तदान शिबीरांचा संपूर्ण खर्च ओएनजीसी व्यवस्थापनाकडून केला जातो.

या वर्षी वर उल्लेख केलेल्या सर्व ठिकाणी एकुण 12 रक्तदान शिबीरे घेण्यात आली व एकुण 1643 विक्रमी वाटल्या रक्त जमा करण्यात आले. ब-याच शिबीरात विक्रमी रक्तदान झाले यामध्ये नव्याने भरती झालेले कर्मचारी व अप्रेंटीस यांचा मौलाचा वाटा आहे. यावर्षीच्या 12 शिबीरांचे रक्तदान संकलन खालीलप्रमाणे -

| अ क्र | स्थान | रक्त वाटल्या | |
|---|---|---|---|
| 1. | उरण एलपीजी प्लांट | 560 | विक्रमी |
| 2. | पनेवल कार्यालय | 130 | विक्रमी |
| 3. | न्हावा सप्लाय बेस | 47 | -- |
| 4. | पुनम नगर ओएनजीसी कॉलनी | 28 | -- |
| 5. | मेकर टॉवर्स | 37 | -- |
| 6. | 11 हाई | 122 | विक्रमी |
| 7. | एनबीपी ग्रीन हाइट्स | 182 | विक्रमी |
| 8. | वर्सोवा कोळीवाडा | 110 | विक्रमी |
| 9. | खार दांडा कोळीवाडा | 88 | प्रथमच |
| 10. | वरळी कोळीवाडा | 91 | -- |
| 11. | मढ कोळीवाडा | 148 | प्रथमच |
| 12. | हेलीबेस | 100 | विक्रमी |
| | **एकूण** | **1643** | |

आज ओएनजीसीतील इतर राज्यात कोठेही एवढया मोठया प्रमाणात रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात नाही. त्यामुळे एवढया मोठया प्रमाणात मुंबई मध्ये जे रक्ताचे संकलन होते त्याबद्दल संपूर्ण ओएनजीसीत तसेच मॅनेजमेंटमध्ये देखील मुंबईचा लौकीक असुन याचे सारे श्रेय हे मुंबईतील ओएनजीसीच्या हजारो रक्तदात्यांचे असून आपणां सर्वासाठी हि अभिमानाची बाब आहे. मुंबई ओएनजीसी प्रकल्पाच्या व्यवस्थपनाचे सहाकार्याबद्दल आभार.

धन्यवाद,

**(प्रदीप मयेकर)**
**सरचिटणीस**

ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिति झिंदाबाद!
ओएनजीसी कर्मचारी संघटना झिंदाबाद! कामगार एकता झिंदाबाद!!